# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.३/२०२३** **दिनांक ०५/०२/२०२३**
**स्थळ- जिल्हा न्यायालय,अहमदनगर** **वेळ- दुपारी १२.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा रविवार दि.०५/०२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.स्वीस/१९/२०२३, जिल्हा न्यायालय,अहमदनगर, दि.०४.०२.२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा रविवार दि.०५/०२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री.राहूल जाधव,**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** **दि.२०.०१.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या तदर्थ समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.८०** **दि.२०.०१.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या तदर्थ समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. सन-२०२३ च्या साठा संपुष्टात आलेल्या श्री साई दैनंदिनी व श्री साईबाबा दिनदर्शिकांची वाढीव छपाई कामाचा कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**२. श्री साईचरित्र हिंदी व प्रादेशिक भाषेतील श्री साईचरित्र देणगी स्वरुपात स्विकार करणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**३. सन-२०२३ चे सहा साईलीला अंक (मराठी व हिंदी,इंग्रजी प्रत्येकी) (व्दैमासिके) तसेच अंक वितरणकामी पाकीटे छपाई पुरवठा होणेसाठी ई-निविदा मागविणे तसेच इतर अनुषंगीक बाबींसाठी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**४. संस्थान प्रकाशित २१ प्रकाशने (पुस्तके) पुनर्मुद्रण /छपाई करणेसाठी येणारे अपेक्षित अंदाजे खर्चास तसेच विहीत पध्दतीने ई-निविदा मागणी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**५. श्री साईभक्तांचे सुविधेसाठी वार्षिक मागणीचे २५ टक्के जादा पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-कॅन्टीन विभाग)**

---

**६. मा.जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कार्यालय,अहमदनगर यांचेकडील सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी रु.७५ लक्ष मात्र अर्थसहाय्य मागणीचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**७. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने खराब झालेले रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे खराब व चांगले डबे विक्री करणेकामी प्राप्त उच्चतम दरासंदर्भात निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.८१/७ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-अभिलेख कक्ष)**

---

**विषय नं.३** **आर्थिक वर्ष २०२३-२४ चे मूळ अंदाजपत्रक व आर्थिक वर्ष २०२२-२३ चे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.८२** **संस्थान कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी व आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यांचा खर्च विश्वस्त निधीमध्ये दर्शविलेला आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ चे तरतुदीनुसार सदरचा खर्च व्यवस्थापन निधीमधुन करणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे अंदाजपत्रकात सुधारणा करण्यात यावी. सुधारीत अंदाजपत्रकातील खर्चाची रक्कम रु.१७८ कोटी पैकी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ चे कलम २२ मधील तरतुद क्रमांक २ मधील नियम क्र.२ नुसार न्यासाचे सन २०२१-२२ चे एकुण उत्पन्न ४३६.९५ कोटी चे १० टक्के रक्कम रु.४३.६९ कोटी व्यवस्थापन निधीत वर्ग करुन त्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रकातील खर्च रक्कम रु.२२९ कोटी पैकी आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या एकुण प्रस्तावीत अंदाजे रक्कम रु.८३५ कोटी उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम रु.८३.५० कोटी व्यवस्थापन निधीत वर्ग करुन त्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. व्यवस्थापन निधीत दर्शविलेल्या उर्वरीत खर्चास (संस्थान कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी व आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन व भत्ते इ. खर्चास) शासनाची विहीत पध्दतीने मान्यता घेण्यात यावी. तत्पुर्वी मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मान्यता घेण्यात यावी. मा.उच्च न्यायालयाचे व शासनाचे मान्यतेस अधिन राहून आर्थिक वर्ष २०२३-२४ चे मूळ अंदाजपत्रक व आर्थिक वर्ष २०२२-२३ चे सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने चक्रिय पध्दतीने पाठविलेले विषय आयत्या वेळेचे विषय म्हणून घेण्यात आले ते खालील प्रमाणे-**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव-२०२३ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रक्कम रु.३३,६२,५४९/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास व याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८३** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** **सन २०२३ मधील संस्थानमार्फत साज-या होणा-या तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८४** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**वरील निर्णय क्र. ८० ते ८४ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर दुपारी ३.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(राहूल जाधव)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ.राजेंद्र भोसले,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगरतथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**